## प्रकरण पहिले

## विषय प्रवेश

### १.१ सहकाराची संकल्पना :

सहकाराची कल्पना मानवाला नवीन नाही. मानवी समाज हा एकमेकांच्या सहकारावरच विकसित झालेला आहे. जगातील प्रत्येक देशात विविध लोक एकमेकांस विविध प्रकारे सहकार्य करीत असतात. "एकमेकां सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ" या संतवाणीतही सहकाराचा संदेश आहेच. पूर्वीच्या अनेक जमाती आणि शिकारी टोळ्या यांच्याकडे पाहिले तर सहकारी तत्त्व मानवी जीवनामध्ये बरेच रुळले होते. असे आढळून येईल. जीवन जगणे आणि जीवनाचे संरक्षण करणे या दृष्टिकोनातून मानवाने सहकार अंगीकारला होता.

सहकाराची कल्पना मानवी रक्तात भिनलेली असून तिला शास्त्रीय स्वरुप देण्याचे कार्य अर्थशास्त्रज्ञांनी व विचारवंतांनी केलेले आहे.

### १.२ सहकाराच्या काही व्याख्या :

"सहकार" या संकल्पनेची एकच समर्पक व्याख्या देणे कठीण आहे. सहकाराचे स्वरुप देशापरत्वे भिन्न आहेच. परंतु देशांतर्गत स्वरुपसुद्धा भिन्नभिन्न आढळते. त्यामुळे सहकाराच्या व्याख्यांमध्ये एकवाक्यता नाही. सहकाराच्या काही महत्त्वाच्या व्याख्या तज्ज्ञांनी पुढील प्रमाणे केलेल्या आहेत.

#### सर होरेस प्लंकेट :

"व्यक्तींच्या संघटनेतून परिणामकारक ठरणारे स्वावलंबन म्हणजे

LIBRARY

सहकारी चळवळ होय. सहकाराची तीन उद्दिष्टे आहेत. उत्तम शेती, उत्तम व्यवसाय व उत्तम राहणीमान."

सर प्लंकेट यांच्या वरील व्याख्येत पुढील वैशिष्टयांचा समावेश आहे.

अ) सहकारामुळे स्वावलंबन वाढते.

आ) सहकार म्हणजे व्यक्तींची संघटना आहे.

इ) सहकारामुळे कोणत्याही व्यवसायाची कार्यक्षमता वाढते. जसे शेती, उद्योग, व्यापार.

ई) सहकारामुळे राहणीमान सुधारते.

सी.आर.फे :

"नि:स्वार्थी वृत्तीने व्यापार किंवा व्यवहार करण्यासाठी दुर्बलतेतून अस्तित्वात आलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. तसेच सभासदांनी सहकारी संस्थेमार्फत केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात संस्थेच्या नफ्यात भागीदार होता येईल. या अटीवर संस्थेचा कारभार चालविण्यात येतो."

या व्याख्येची ठळक वैशिष्ठये पुढील प्रमाणे आहेत -

अ) सहकारी संस्था म्हणजे व्यक्तींची संघटना आहे.

आ) सहकारी संस्थेचा उगम आर्थिक दुर्बलतेतून होतो.

इ) सहकाराचा हेतू सामूहिक व्यवहार किंवा व्यापार आहे.

ई) सहकारी संस्थेचा कारभार नि:स्वार्थी वृत्तीने चालविण्यात येतो.

उ) सहकारी संस्थेची जबाबदारी प्रत्येक सभासदावर असते.

ऊ) सहकारी संस्थेमार्फत सभासदाने केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात त्यास लाभांश देण्यात येतो.

सहकाराची प्राथमिक प्रयत्नातील व्याख्या म्हणून या व्याख्येला महत्त्व आहे. तथापि या व्याख्येत दोन दोष आहेत.

अ) या व्याख्येतील व्यापार किंवा व्यवहार हे शब्द संकुचित आहेत, कारण आधुनिक सहकारी संस्था इतर विविध कार्ये करीत असतात.

ब) सहकारी संस्थेचे सभासदत्व "ऐच्छिक" असते, याचा व्याख्येत उल्लेख नाही.

एम्. डार्लिंग :

"अर्थव्यवस्था" किंवा "अर्थपध्दती" यापेक्षा काहीतरी अधिक सांगणारी संकल्पना म्हणजे सहकार होय. हृदय व मन यांना आवाहन करणारी ही संकल्पना आहे. व्यवसायातील धर्म म्हणजे सहकार तसेच स्वावलंबन व सेवा यांचे शिक्षण देणारी सहकारी चळवळ असते."

या व्याख्येत सहकाराच्या नैतिक मूल्यांवर अधिक भर दिलेला आहे. ही व्याख्या सहकाराचे अधिष्ठान वाढविणारी आहे. पण व्यावहारिक नाही. कारण सहकारातून नेहमीच सेवाभाव, मानवता व नैतिकता मिळेलच असे नाही.

एच्. कालव्हर्ट :

"व्यक्तींनी स्वेच्छेने ऐकत्रित येऊन स्वतःच्या व सर्वांच्या आर्थिक हित-रक्षणासाठी व वृध्दीसाठी समतेच्या पायावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय."

या व्याख्येत पुढील प्रमाणे सहकाराची तत्वे व वैशिष्टये आहेत.

अ) सहकारी संस्था ही व्यक्तींची संघटना असते.

आ) सहकारी संस्थेचे सभासदत्व ऐच्छिक असते.

इ) सहकारी संस्था समतेच्या तत्त्वावर आधारलेली असते.

ई) सहकारी संस्थेचे उद्दिष्ट सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण हे असते.

या व्याख्येत सहकाराची मूलभूत वैशिष्ठ्ये समाविष्ट असल्याने ही व्याख्या सर्वमान्य होती. तथापि, या व्याख्येत एक दोष आहे. तो म्हणजे या व्याख्येत सभासदांच्या आर्थिक हितरक्षणावर जास्त भर दिला आहे. वास्तविक आर्थिक प्रगतीबरोबरच सहकारी चळवळीतून समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य होण्याची अपेक्षा असते.

वैकुंठलाल मेहता :

"समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, समान गरजा असणाऱ्या व्यक्तींची स्वेच्छेने संघटना स्थापन करण्यास प्रवृत्ती करणारी एक चळवळ म्हणजे सहकार होय."

या व्याख्येत सहकाराच्या पुढील वैशिष्टयांचा समावेश केलेला आहे -

अ) सहकारी संस्था ही व्यक्तींची संघटना आहे.

आ) सहकारी संस्थेचे सभासदत्व ऐच्छिक असते.

इ) सहकारी संस्थेच्या सभासदांच्या गरजा समान असतात.

ई) सहकारी संस्थेचे सर्व सभासद समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सामुदायिक प्रयत्न करतात.

डब्ल्यू. पी. वटकीन :

"एकता, लोकशाही, समता आणि स्वातंत्र्य या तत्त्वावर आधारलेली सामाजिक संघटना म्हणजे सहकार होय."

मॅक्लगन कमिटी (१९५०)

"सहकारी सिध्दांतातून असे स्पष्ट होते की, एकाकी व आर्थिक-दृष्टया दुर्बल व्यक्तींनी संघटना स्थापन करुन परस्पर साहाय्य व नैतिक प्रगतीचे धोरण स्वीकारल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची संपूर्ण प्रगती होतेच. शिवाय श्रीमंत व सामर्थ्यशाली व्यक्तींना मिळणारे सर्व भौतिक फायदे त्यांना मिळू लागतात."

भारतीय सहकारी कायदा :

"सहकारी तत्त्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितरक्षण व हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय."

वरील विविध व्याख्यांमधून सहकाराची अनेकविध अंगे स्पष्ट होतात. गरजांची पूर्तता, स्वावलंबन, आर्थिक काटकसर, परस्पर साहाय्य, त्याग, एकात्मता, स्वातंत्र्य, हक्क, नैतिकता, परिवर्तनशीलता वगैरे घटकांचा समावेश सहकारात होतो.

१.३ सहकाराची लक्षणे :

१) व्यक्तींचे संघटन :

सहकारी संस्था ही प्रामुख्याने व्यक्तींची संघटना असते. या संस्थेत भांडवलापेक्षा व्यक्ती महत्त्वाची असते. भांडवलाला दुय्यम स्थान असते. समान आर्थिक गरजा असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करीत असतात. असंघटितपणा, अकार्यक्षमता इत्यादी घटकांना सहकारात स्थान नाही.

२) एक व्यवसायसंस्था :

सहकारी संस्था ही एक व्यवसाय संस्था आहे. सहकारी संस्था म्हणजे उत्पादन-व्यापार-सेवा इत्यादी आर्थिक व्यवहार करणारी व्यवसाय संस्था आहे. सहकारी संस्थेच्या सभासदांनी स्वत:च्या भांडवलावर व जबाबदारीवर व्यावसायिक धोके पत्करून सुरु केलेले एक व्यावसायिक धाडस सहकारी संस्था करीत असते.

३) ऐच्छिक संघटना :

सहकारी संस्थेचे सभासदत्व हे पूर्णत: ऐच्छिक असते. तेथे सक्ती, जबर-दस्ती, दबाव नसतो. सभासद शुल्क भरल्यानंतर सभासदत्व प्राप्त होते.

४) लोकशाही व्यवस्थापन :

सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पध्दतीने चालविला जातो. प्रत्येक सभासदास संस्थेच्या व्यवस्थापनात समान हक्क असतात. एक सभासद एक मत या लोकशाही तत्त्वाचा स्वीकार करण्यात आलेला असतो.

५) सामाजिक व आर्थिक चळवळ :

सहकारी संस्थेत प्रत्येकास समान वागणूक असते. कोणात्याही तत्वावर त्या ठिकाणी भेदभाव नसतो. त्यातून समता निर्माण होते. त्यामुळेच ही एक सामाजिक चळवळ बनते. सहकारातून अनेक संस्था सभासदांचे आणि पर्यायाने समाजाचे आर्थिक प्रश्न सोडवीत असतात. बरेचसे आर्थिक प्रश्न सुटले तर समाजात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण होत असते. त्यामुळे अनेक सामाजिक समस्यांची सोडवणूक होण्यास मदत होते.

## १.४ सहकारी पतपुरवठा चळवळीचा प्रारंभ :

सहकारी तत्त्वाचा वापर पतपुरवठ्यासाठी करणारे जर्मनी हे जगातील पहिले राष्ट्र आहे. १९ व्या शतकाच्या मध्यास जर्मनीत पत सहकारी चळवळीस सुरुवात झाली. जर्मनीत सहकारी चळवळ सुरु होण्यास जर्मनीमधील परिस्थितीच कारणीभूत ठरली असे दिसून येते. वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांना आपला चरितार्थ चालविण्यासाठी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागे. त्यामुळे तेथील शेतकरी कर्जबाजारी होता. त्या काळात जर्मनीमधील व्यापार ज्यू लोकांच्या ताब्यात होता. शेतकरी व कारागीर आपल्या वस्तूंची खरेदी ज्यू लोकांमार्फतच करीत. त्यामुळे ज्यू व्यापारी हे कारागीर व शेतकरी यांचे शोषण करीत. अशा परिस्थितीत हर फ्रान्स शूल्झ व एफ्. डब्ल्यू. रफायझान यांनी अनुक्रमे नागरी व ग्रामीण क्षेत्रासाठी योग्य सहकारी संघटन सुचविले. स्वावलंबन व परस्पर सहकार्य यामधूनच दुर्बल लोकांचा प्रश्न सुटेल असे त्यांना दिसून आले. दोघेही दूरदृष्टीचे आणि निष्ठावंत असे समाजसेवक होते.

शूल्झ हे मेयर होते. सन १८४९ मध्ये पादत्राणांसाठी लागणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणात खरेदी करुन तो पादत्राणे तयार करणाऱ्यांना कमी दरात उपलब्ध व्हावा यासाठी पादत्राणे बनविणाऱ्यांची सहकारी संस्था स्थापन केली. सन १८५० मध्ये त्यानी आपल्या राहत्या गावी पहिली पतसंस्था स्थापन केली. सभासदांना कर्ज देण्यासाठी निधी उभारणे हा या संस्थेचा हेतू होता. सन १८५६ मध्ये एक पुस्तक प्रसिध्द करुन त्यानी सहकाराच्या तत्त्वाचा प्रसार केला. यामधून जर्मनीत सर्वत्र नागरी सहकारी बँका स्थापन झाल्या. पुढे त्यांची संघसंस्थाही स्थापन करण्यात आली. या बँकांच्या संघ संस्थांच्या प्रयत्नाने १८६७ ला जर्मनीत पहिला सहकारी कायदाही तयार करण्यात आला.

रफायझान हे नगरपालिकेचे मेयर होते. दारिद्र्यात अपणाऱ्या शेतकऱ्यांची सावकार पिळवणूक कशी करतो हे त्यानी स्वत: पाहिले होते. दुष्काळात शेतकऱ्यांचा त्रास कमी व्हावा, सावकारांकडून केली जाणारी पिळवणूक व शोषण थांबावे यासाठी त्यानी प्रयत्न केले. रफायझान यांनी गरीब शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारकडून सहाय्य म्हणून धान्य घेतले. गरीब लोकांना अन्न देण्यासाठी "पुअर पिपल्स कमिटी" नेमली. सन १८४९ मध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी अनेक सहकारी संस्था स्थापन केल्या व त्यांचा संघही स्थापन केला. नैतिक अधिष्ठान आणि सामूहिक तारणाच्या आधारे एक निधी उभा केला. या संस्थामध्ये अमर्यादित देयता तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला होता. सन १८७७ मध्ये संस्थांची रफायझान युनियन ही संघसंस्था स्थापन करण्यात आली. रफायझानच्या नावानेच गावातील सहकारी पतसंस्था ओळखल्या जातात. नफा मिळविणे हा संस्थेचा उद्देश नसतो. नफ्यातील काही भाग सभासदांत लाभांशाच्या स्वरूपात वाटला जातो.

जर्मनीमधील या प्रकारच्या सहकारी संस्थांची आदर्श कार्यपध्दती व तत्त्वे समोर ठेवून जगातील अनेक देशांमध्ये पतपुरवठ्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. अशा तऱ्हेने पतपुरवठ्याच्या कार्यासाठी सहकाराचा वापर जर्मनीमध्ये प्रथम करण्यात आला.

### १.५ सहकारी बँका :

आधुनिक काळात पतपुरवठा करणाऱ्या संस्थांचे सहकारी बँका आणि व्यापारी बँका असे वर्गीकरण करता येते. याचा अर्थ, सहकारी संकल्पनेचा बँकिंग क्षेत्रात देखील उपयोग करता येतो.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास सामान्य शेतकरी श्रीमंत व्यापा-

-यांच्या पकडीत अडकलेला होता. त्यातून बाहेर येण्याचा त्याचा प्रयत्न म्हणजे सहकारी बँका होय. सहकारी बँका म्हणजे, "आधुनिक बँकांची विविध कार्ये सहकारी तत्त्वानुसार आणि सरकारी धोरणानुसार करणारी संस्था होय". याचा अर्थ लोकांकडून ठेवी स्वीकारणे, त्यांना कर्जे देणे आणि बँकिंगविषयक इतर सेवा उपलब्ध करून देणे अशी कार्ये सहकारी बँका करीत असते.

सहकारी बँकेच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत -

१) "नियमित बचत करण्यास प्रोत्साहन देणे आणि सोईस्कर परतफेडीच्या अटी व सवलतीचा व्याजदर ठरवून सभासदांना लहान रकमेची कर्जे देणे यासाठी कामगारांनी संघटित होऊन स्थापन केलेली आणि त्यांनीच नियंत्रण केलेली संस्था म्हणजे सहकारी बँक होय." - हेव्हाइन

२) "सहकारी बँक म्हणजे अशी संस्था की, ज्या ठिकाणी गरिबांसाठी त्यांना मान्य असलेल्या तारणाच्या अटींवर बँकिंग व्यवहार केले जातात."
- हेन्री उल्फ

वरील दोन्ही व्याख्यांचा विचार करता आपणास असे म्हणता येईल की, सहकारी तत्त्वानुसार आणि व्यवहारानुसार बँकिंगचा व्यवहार करणाऱ्या संस्थेस सहकारी बँक म्हणतात.

सहकारी बँका तसेच सहकारी पतपुरवठा संस्था पुढील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थापन करण्यात येतात.

सहकारी बँका तसेच सहकारी पतपुरवठा संस्था पुढील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थापन करण्यात येतात.

१ सहकारी बँकेच्या सभासदांना काटकसर व बचतीची सवय लावणे.

२. सहकारी बँकेच्या सभासदांना बँकिंगच्या सेवा उपलब्ध करून देणे.


३ सहकारी बँकेच्या सभासदांना सुलभ अटीवर व कमी व्याज दराने कर्ज देणे.

४ सहकारी बँकेच्या सभासदांनी काढलेली कर्जे योग्य कारणासाठी वापरली.जातात किंवा नाही यावर लक्ष ठेवणे.

५ सहकारी बँकेचे कर्जव्यवहारातील धोके कमी करणे.

## १.६ भारतातील सहकारी पतपुरवठ्याची रचना :

भारतातील विविध प्रकारच्या संस्थापैकी सहकारी पतपुरवठा संस्था महत्त्वाच्या आहेत. त्यांची रचना खालीलप्रमाणे आहे.



भारतामध्ये सहकारी पतपुरवठयामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व सहकारी पतसंस्था व बँका यांचे विविध पातळीवरील संख्यात्मक स्वरूप पाहता ही सहकारी पतपुरवठयाची रचना इजिप्तमधील पिरॅमिडसारखी दिसून येते. कारण प्राथमिक स्तरावर पतपुरवठयाचे कार्य करणाऱ्या बँका आणि शेवटी राज्य पातळीवरील शिखर बँक या रचनेतील नागरी सहकारी बँकांचा अभ्यास हा प्रस्तुत लघुप्रबंधाचा विषय आहे.

## १.७ संशोधन आराखडा :

### १.७.१ उद्दिष्टे :

मानवी समाज हा एकमेकांच्या सहकारावरच विकसित झालेला आहे. जर्मनीमध्ये ६२ फ्रान्स शूल्टस्डर्फ व रफायझान यांनी अनुक्रमे नागरी व ग्रामीण क्षेत्रासाठी योग्य सहकारी संघटन सुचविले. जर्मनीमधील सहकारी संस्थांची आदर्श कार्यपध्दती व तत्त्वे समोर ठेऊन जगातील अनेक देशांमध्ये सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. आधुनिक काळात पतपुरवठा करणाऱ्या संस्थांचे सहकारी बँका आणि व्यापारी बँका असे वर्गीकरण करता येते. याचा अर्थ सहकारी संकल्पनेचा बँकिंग क्षेत्रातदेखील उपयोग करता येतो. भारतात सह-कारी पतपुरवठयामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व सहकारी पतसंस्था आणि बँका यांचे विविध पातळीवरील संख्यात्मक स्वरूप पाहता ही सहकारी पत-पुरवठयाची रचना इजिप्तमधील पिरॅमिडसारखी दिसून येते. या रचनेतील एका नागरी सहकारी बँकांचा अभ्यास हा प्रस्तुत लघु प्रबंधाचा विषय आहे.

दिनांक १६ ऑगस्ट १९४० रोजी "दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, सातारा" ही संस्था स्थापन करण्यात आली. सदर सोसायटीचे दिनांक २१ ऑक्टोबर, १९६९ रोजी बँकेत रूपांतर झाले. या बँकेची स्थापनेपासून प्रगती कशी झाली याचा अभ्यास या लघुप्रबंधात

केला आहे. अभ्यासाची नेमकी उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) रयत सेवक सहकारी बँकेच्या कामकाजाचा अभ्यास करणे.

आ) रयत सेवक सहकारी बँक ही आपल्या सभासदांना कोणाकोणत्या सुविधा उपलब्ध करुन देते याचा आढावा घेणे.

इ) रयत सेवक सहकारी बँकेची १९६८-६९ ते १९९१-९२ या काळातील आर्थिक बैठक अभ्यास.

ई) बँकेच्या कर्ज आणि गुंतवणूक व्यवहारांचा अभ्यास करणे.

उ) बँकेच्या आर्थिक स्थैर्याचा अभ्यास करणे.

१.७.२ संशोधन पध्दती :

रयत सेवक सहकारी बँकेच्या संदर्भातील आकडेवारी गोळा करताना ती पूर्णपणे दुय्यम सामग्रीतून मिळविलेली आहे. त्यासाठी बँकेच्या १९६७-६८ ते १९९१-९२ या काळातील वार्षिक अहवालांचा संदर्भ घेतलेला आहे. याशिवाय "अर्थसंवाद", जिल्हा औद्योगिक केन्द्र, सातारा, सातारा शहरातील १९ बँकांचे वार्षिक अहवाल, सातारा जिल्हा सांख्यिकी विभाग येथून माहिती मिळविली आहे.

"दि रयत सेवक सहकारी बँक" ही रयत शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांची बँक आहे. सेवकांच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी या बँकेची स्थापना केलेली आहे. नागरी सहकारी बँकांचा "पगारदार कर्मचाऱ्यांच्या पतसंस्था" हा एक महत्त्वाचा घटक आहे. रयत सेवक बँक ही प्रथम पतसंस्था आणि नंतर बँक अशी विकसित झाली असल्याने तिचे कामकाज कसे चालले हे अभ्यासणे उपयुक्त ठरते. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार दक्षिण महाराष्ट्रात झालेला आहे. कर्मचाऱ्यांची आणि त्या अनुषंगाने बँक सभासदांची संख्याही मोठी आहे. अशा बँकेची आर्थिक बैठक, कर्ज आणि गुंतवणूक

व्यवहार, आर्थिक स्थैर्य अभ्यासने व योग्य त्या सूचना करणे महत्त्वाचे आहे. संशोधक स्वत: रयत शिक्षण संस्थेत काम करणारा प्राध्यापक तसेच रयत बँकेचा सभासद असल्यामुळे हेतुत: अभ्यासासाठी या बँकेची निवड केली आहे.

रयत सेवक सहकारी बँकेचे मुख्य कार्यालय सातारा या ठिकाणी आहे आणि शाखा अहमदनगर, पुणे व सांगली या ठिकाणी आहेत. त्यामुळे १९८८-८९ ते १९९१-९२ या कालावधीतील कार्याचा अभ्यास केला आहे.

### १.७.३ लघुप्रबंधाची रचना :

पहिल्या प्रकरणामध्ये सहकाराची संकल्पना आणि पतपुरवठा यांची रचना स्पष्ट केलेली आहे. दुसऱ्या प्रकरणात नागरी सहकारी बँकांचा इतिहास व विकास यांचा आढावा घेतला असून सातारा शहरातील बँक-विषय सुविधांचा अभ्यास केला आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये रयत सेवक सहकारी बँकेची स्थापना आणि विकास तसेच आर्थिक बैठक, शाखा विस्तार इत्यादींचा सर्वकष आढावा घेतला आहे. रयत सेवक सहकारी बँकेचे कर्ज आणि गुंतवणूक व्यवहाराचा अभ्यास चौथ्या प्रकारणात केला आहे. पाचव्या प्रकरणात बँकेचा खर्च, उत्पन्न, नफा गुणोत्तरे इत्यादींच्या आधारे बँकेच्या आर्थिक स्थैर्याचा अभ्यास केला आहे. शेवटच्या प्रकरणामध्ये लघुप्रबंधाचा गोषवारा दिलेला आहे.

......